IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# भारतीय राज्यघटना आणि विकासाची ऐतिहासिक पार्श्वभुमी

सहा.प्रा.नासीर कॉसम शेख (राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
श्री विठ्ठल रूख्मिणी कला, वाणिज्य व विज्ञान महा.
सवना ता. महागांव जि. यवतमाळ.

**(Absatract )सारांश;-**

भारतामध्ये इंग्रजी राजवटीचा प्रवेश झाला. ईस्ट इंडिया कंपनीतील अधिकारी आणि कर्मचारी हे व्यापारी धोरणाशी निगडीत होते. ईस्ट इंडिया कंपनीने भारताला लुटून नेण्याचा प्रयत्न केलेला आहे. ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना १६०० मध्ये केली. हिंदी महासागराच्या क्षेत्रात व्यापार करण्याकरीता ही कंपनी स्थापन केल्या गेली. १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्याव्दारे ब्रिटीश पार्लमेंटने भारतीयांकरीता उदार धोरण अवलंबविण्याची शश्वती दिली १८६१, १८९२, १९०९, १९१९ आणि १९३५ च्या भारत सुधारणा कायदयाव्दारे भारतामध्ये अनेक सुधारणा करण्यात आल्या होत्या. ब्रिटीशांनी शासन कारभार चालवीत असतांना जनतेच्या प्रतिक्रीया जाणून घेण्यासाठी विविध प्रकारचे कमीशन व समित्या नेमल्या. लोकशाही शासनाच्या बुरख्याखाली ब्रिटीशांनी भारतीय लोकांवर एकाधिकाराशाही ही पध्दतशीरपणे गाजवली.

**संशोधनाची उद्दिष्टये –**

प्रस्तुत संशोधन विषयाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे नमुद करण्यात येईल.

१. विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे याचे अध्ययन करणे.

२. आधुनिक लोकशाहीची प्रक्रिया ब्रिटीश काळात मिळाली याचा शोध घेणे.

३. भारतातील संसदीय शासन प्रणालीचा ऐतिहासिक पार्श्वभूमीचा उलगडा करणे.

**संशोधन विषयाची गृहीतकृत्ये –**

प्रस्तुत विशयाला नवीन दिशा व मागर्दर्शन मिळण्याकरीता पुढील गृहीतकृत्य मांडण्यात आली आहे.

१. ब्रिटीशांनी भारतामध्ये केंद्रीयकृत पध्दतीने राज्यशासन केले.

२. १८५८ च्या कालखंडात ब्रिटीशांच्या शासन करण्याच्या पध्दतीमध्ये बदल झाला नाही.

३. भारताच्या राजयघटनेवर ब्रिटीश कारकीर्दीचा प्रभाव पडलेला नाही.

**संशोधन पध्दती –**

प्रस्तुत विषयाचे संशोधन पूर्ण करण्याकरीता प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

**प्रस्तावना –**

कोणत्याही देशाच्या विकासाचा आधारस्तंभ तेथील नागरीकांना मिळालेलया अधिकारीच्या दर्जावर अवलंबुन असते. जे राज्य नागरीकांना त्यांच्या स्वत:च्या न्याय अधिकारांपासून वंचीत ठेवु शकतात. अधिकार हे नागरीकांच्या सूप्त व व्यक्त गुणांच्या विकासाकरीता पोषक परिस्थिती निर्माण करीत असतात. स्वातंत्र्य, समता, बंधूता व न्याय हया लोकशाही मूल्यांच्या मुलभूत आधारावर त्या देशाचा विकास होतो. भारतासारख्या देशांमध्ये प्राचीन, मध्ययुगीन, मोघल व ब्रिटीशकालीन ऐतिहासिक वारश्याचे अध्ययन केल्यास लोकशाही मुल्यांची स्थिती फारशी प्रशंसनिय नव्हती अशी पूरावे मिळतात. राष्ट्रीय एकात्मतेचा भाव व सामाजिक विषमतेमुळे विदेशी राज्यकर्त्यांनी इंग्रजांनी भारतावर शेकडो वर्ष राज्य केले हे आपणास इतिहासात दिसून येते. त्यानंतर मोघलांचे शासन भारतावर लागू झाले त्यामुळे नागरीकांच्या अधिकारांवर गदा आली.

ब्रिटीशांनी भारतातील परिस्थितीचा फायदा घेतला आणि आपली सत्ता येथे स्थापन केली आणि त्याचा तीव्र गतीने विस्तार केला. विखूरलेलया प्रशासकीय व्यवस्थेला ब्रिटीशांनी एकतेच्या सुत्रात बाधण्याचे व्यवस्थीत कार्य इंग्रजांनी करून दाखविले. आणि ब्रिटीशांनी भारतीयांना लोकशाहीचे धडे गिरविण्याचे महान कार्ये केले. २६ जानेवारी १९५० ला जी भारतात राज्यघटना लागू करण्यात आली आहे. त्या राज्यघटनेत इंग्रजांची छाप पडलेली दिसून येते.

**घटनात्मक विकास आणि भारत –**

विकास हे निरंतर चालणारे एक साधन आहे. भारतीय राज्य घटनेच्या विकासाचा पाया प्राचीन व मध्ययुगीन काळामध्ये साम्र्‍जयाच्या विस्ताराची संकल्पना आस्तित्वात आली आहे. लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचे पुरावे तुरळक प्रमाणामध्ये आढळल्याचे दिसुन येतात.

प्रमुख राजकीय पद प्राचीन आणि मध्ययुगीन काळामध्ये अनुवांशिक स्वरूपाचे होते. यामुळे तत्कालीन संवेज्ञानिक संहरचनेबाबत निर्णय निर्धारण प्रक्रिया ही केंद्रीय स्वरूपाची होती. वेद, पुराण, उपनिषद व ऋग्वेद यामध्ये राजावर लोकमताचे दडपण येत होते. विदेशी शासकांनी भारतामध्ये शासन करीत असतांना येथील प्राचीन व मध्ययुगीन वारस्याच्या मूलभूत सापडयाला धक्का न लावता भारत देशावर दिडशेपेक्षा जास्त वर्षापर्यंत शासन केलेले आहे. आधुनिक काळातील गणतंत्राप्रमाणे बौध्दकालीन गणतंत्राचे अस्तित्व भारतामध्ये होते. परंतु ईस्ट इंडिया कंपनीने भारतीयांवर शासन प्रस्थापित करण्याकरीता भीषण अन्याय व अत्याचार केले होते. शासनावर नियंत्रण प्रस्थापित करतांना लोकतांत्रिक मार्गाने नियंत्रण प्रस्थापित करणे राजकीय विकासामध्ये अभिप्रेत असते. त्याची सुरूवात १८५८ पूर्वी झाल्याचे ऐतिहासिक पुरावे दिसून येतात.

१८५७ चा उठाव शमविण्यामध्ये ब्रिटीशांना तारेवरची कसरत करावी लागली. १८५७ च्या उठावामुळे भारतीयांमध्ये राष्ट्रप्रेम व देश प्रेमाची भवना लोकांमध्ये निर्माण झाली. लोकांमध्ये देशप्रेमाची असलेली आग विझविण्यासाठी ब्रिटीशांना घाम गाळावा लागला. भारतामध्ये आपले साम्राज्य कायम टिकवून ठेवण्यासाठी ब्रिटीशांनी भारतीयांना आमीष दिले. आणि त्यामुळे आधुनिक काळातील राज्यघटनेचा पाया रचलयास मोलाचे सहकार्य लाभले. म्हणजेच ब्रिटीशांनी चालविला शासनकारभार याचे संपूर्ण अध्ययन भारतीय लोकांना मिळाले. आणि त्यामुळेच भारतीय लोकांमध्ये स्वातंत्र्याची चाहुल लागली. युग कोणतेही असो शासन सत्तेवर जनतेचे नियंत्रण असणे हे लोकशाहीशी अभिप्रेत आहे.

**१९१९ चा कायदा –**

१९१९ च्या भारत शासन अधिनियमांची अंमलबजावणी १९२० मध्ये करण्यात आली. या कायद्यामध्ये अंर्तर्भुत असलेलया घटकानुसार शासन चालवतांना कोणत्या बाबी समोर आल्या याचे अध्ययन करण्याकरीता १० वर्षांनी आयोगाची नेमणूक करण्याचे ठरविण्यात आले. १९२० चे भारतीयांचे असहयोग आंदोलन स्वराज्य दलाची भूमिका हया गोष्टी निर्माण झाल्या. १९२८ मध्ये कलकत्ता येथे काँग्रेसच्या अधिवेशनात स्वराज्याची मागणी करण्यात आली. इंग्रजांनी भारतीयांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे १९३० मध्ये पूर्ण स्वराजयाची मागणी करण्यात आली. भारतीयांचा असंतोष वाढत गेला. त्यामुळे इंग्रजांनी दुर्लक्ष करून चालणार नाही. पंडीत नेहरू यांनी सायमन कमीशन व गोलमेज परिषदेमध्ये इंग्रजाविरूध्दचा असंतोष दाखविला.

**१९३५ सायकन कमिशन च्या शिफारशी –**

सायमन कमीशनवर चर्चा करण्यासाठी लंडनमध्ये तीन गोलमेज परिषदा घेण्यात आल्या होत्या.

१) सायमन कमिशनने दोन वर्षाच्या कालावधीत भारतासाठी कशी राज्यघटना असावी या बाबतीत आपला रिपोर्ट तयार करून मे १९३० मध्ये जाहीर केला.

२) प्रांतातील व्दिदल राज्यपध्दती रद्द करून सर्व खाती लोकप्रतिनिधीच्या ताब्यात देण्यात यावी.

३) ब्रिटिश लोकांनाच मतदानाचा अधिकार ठेवून जाती पंथानूसार राखीव मतदारसंघ असावे.

४) नेहरू अहवालातील तत्वे जर सरकारने स्विकारली नाहीत तर सविनय कायदेभंग सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

५) केंद्रीय कायदेमंडळातील काही सभासद अप्रत्यक्ष निवडून दयावे.

६) राज्यघटना ही लवचिक असून त्यामध्ये आवश्यकतेनूसार बदल करण्याचा अधिकार ब्रिटीश सरकारला असावा.

**१९३५ चा भारत सरकार कायदा –**

भारताच्या प्रांतातील सर्व खात्याचा कारभार भारतीय प्रतिनिधीच्या हाती सोपविण्यात आला. तीन गोलमेज परिषदांनंतर हा कायदा पास झाला. प्रांताना स्वायतत्ता देण्यात आली. १९३५ च्या कायद्याने भारतात अंतर्गत स्वशासनाचा पाया घातल्या गेला. या कायदयाने केंद्रात दुहेरी शासन व्यवस्था सुरू केली आणि या कायदयाने संघराज्याची निर्मीती केली.

**समारोप –**

ब्रिटीशांनी भारतामध्ये जवळ जवळ १५० वर्षे सतता गाजवली. प्रारंभी त्यांनी भारतीयांची लुट करून अन्याय व अत्याचार केले. ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या काळात प्रशासन करण्याच्या अनुभवहीनतेमूळे भारतीयांचा असंतोष १८०७ च्या उठावाच्या रूपाने उफाळून आला. १८५८ नंतर पार्लमेंट ने भारताच्या शासनाची सुत्रे स्वत:च्या हातात घेवून भारतीयांना टप्या टप्प्याने राजकीय व सामाजिक सुधारणा करीत भारतावर सत्ता गाजवली.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१. कश्यप सुभाष – भारत का संविधानीक विकास और स्वाधीनता संघर्ष, रिसर्च पब्लीकेशन, दिल्ली.

२. कटारीया सुरेंद्र – भारत में लोकप्रशासन, आर.बी. एस.ए. पब्लीशस, जयपूर.

३. ग्रोवर बी.एल. – भारतीय स्वातंत्रता संग्राम तथा संवैधानिक विकास – एस.चंद्र अण्ड कंपनी लि. दिल्ली.

४. पाटील. बी.बी. – भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. जोशी, डॉ. सुधाकर – भारतीय शासन आणि राजकारण, विद्या बुक्स पब्लीशर्स, जळगांव.

६. भोळे, डॉ. भा.ल. – भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळापूर प्रकाशन, नागपूर.